# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक- 04.10.2023 वार – बुधवार

---

**<u>गिर्यारोहण</u>**

आयएनएस शिवाजी या नौदल तळावरील 10 सदस्यांच्या गिर्यारोहक तुकडीनं सिक्कीममधील 16 हजारहून अधिक फूट उंचीचं गोएचा ला पास ही खिंड नुकतीच पार करुन पराक्रम केला. कमांडर प्रमोद भांदीर्गे यांच्या नेतृत्वातील या तुकडीनं 21 सप्टेंबरला प्रयाण करण्यापूर्वी कठोर प्रशिक्षण आणि शारीरिक तयारी केली होती. अतिशय प्रतिकूल हवामान, अवघड प्रदेश आणि मुसळधार पावसाचा सामना त्यांना करावा लागला. तरीही ठाम निर्धार आणि सांघिक प्रयत्नांच्या बळावर त्यांनी ही खिंड पार केली. ही मोहीम भारतीय नौदलाची अदम्य इच्छाशक्ती आणि समुद्रात तसंच जमिनीवर एक शक्तिशाली दल म्हणून मिळवलेल्या प्रतिष्ठेचा पुरावाच आहे.

**<u>मालमत्ता</u>**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन आणि कर आकारणी विभागानं सहा महिन्यांत 60 टक्क्यांपेक्षा जास्त करदात्यांकडून 580 कोटी रुपयांचा विक्रमी कर वसूल केला आहे. दुसरीकडे वारंवार आवाहन करूनही कर न भरणाऱ्या मालमत्ता धारकांना आजपासून दोन टक्के विलंब शुल्क लागू होणार आहे. तर थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यासाठी तीव्र मोहीम हाती घेण्यात येणार आहे. गेल्यावर्षी सप्टेंबर अखेरपर्यंत 2 लाख 45 हजार 844 मालमत्ता धारकांनी 364 कोटींचा तर यंदा सप्टेंबर अखेरपर्यंत 3 लाख 66 हजार 636 मालमत्ता धारकांनी 579 कोटी रुपयांचा कर भरला आहे.

**<u>जिपशाळा</u>**

राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांना विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी सेमी इंग्लिश माध्यमाच्या बनवण्यासंदर्भातील प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य शासनाकडे सादर करण्यात आला आहे. खासगी शाळांप्रमाणेच या सेमी इंग्लिश माध्यमाच्या शाळांमधून विज्ञान आणि गणित हे दोन विषय इंग्रजी भाषेतून तर उर्वरित सर्व विषय स्थानिक मराठी, हिंदी आणि उर्दू यासारख्या नियमित भाषेमधून शिकवण्यात येणार आहेत. नवीन शिक्षण धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीनं नियोजन सुरु झालं आहे.

**<u>प्राणी लसीकरण</u>**

पुणे जिल्हा परिषदे तर्फे पशुवैद्यकीय दवाखान्यांमार्फत चार हजार 255 पाळीव श्वान आणि मांजरांना रेबीज प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले. प्राण्याने त्यातही प्रामुख्याने कुत्रा चावल्यामुळे होणारा आजार म्हणजे 'रेबीज' हा आजार जीवघेणा आहे. रेबीजवर प्रतिबंधात्मक लसीकरण हाच एकमेव पर्याय असल्याने आपल्या पाळीव प्राण्यांचे लसीकरण नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

**<u>एमआयटी</u>**

डिजिटल व्यवहार वेबसाईटवर होतात तेव्हा संबंधीत व्यक्तीची संपूर्ण माहिती जमा होत असते. अशा वेळेस आपली खासगी माहिती कोणालाही देऊ नका. यातून 50 टक्के आर्थिक व्यवहारातील फसवणुकीच्या घटना कमी होतील असा सल्ला सायबर तज्ञ रितेश भाटीया यांनी दिला आहे. एमआयटी विश्वशांती विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

**पर्यटन**

यंदाच्या दिवाळी सुटीच्या हंगामात पुणेकर पर्यटकांनी परदेशी पर्यटनाऐवजी देशांतर्गत पर्यटनाला अधिक पसंती दर्शवली असल्याची माहिती शहरातील पर्यटक संस्थांच्या प्रतिनिधींनी दिली. यंदाच्या या सुटीत पुणेकरांकडून पर्यटनासाठी केरळ, राजस्थान त्याचबरोबर ईशान्य भारताला पसंती दर्शवण्यात आली आहे. केरळमधील चॅम्पियन बोट लीग स्पर्धेचं आयोजन केलं जातं ते पर्यटकांसाठी प्रमुख आकर्षण ठरलं आहे.

**जोडी तुझी माझी**

आजच्या कुटुंबव्यवस्थेमध्ये सांगितिक वातावरणानं आणि त्या माध्यमातून एकमेकांना साथ देण्याच्या आणि आनंदाच्या अनुभुतीनं समाजाला सांस्कृतिक ठेवा लाभतो असं मत ज्येष्ठ बासरीवादक पंडित केशव गिंडे यांनी व्यक्त केलं आहे. ते आज पुण्यातल्या माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयात जोडी तुझी माझी या आंतरशालेय गीतगायन स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विद्यार्थी आणि पालक जोडीनं गीतगायन असं या स्पर्धेचं स्वरूप होतं.

**रेल्वे**

पुणे विभागातील पुणे-दौंड रेल्वे मार्गावरील पाटस स्थानकावर इंटरलॉकिंगचे काम पूर्ण करण्यात आलं आहे. गती-शक्ती कार्गो टर्मिनल सुविधेअंतर्गत हे काम पूर्ण करण्यात आलं. या दोन सिमेंट सायडिंग्ज कार्यान्वित झाल्यामुळं, क्लिंकर आणि फ्लाय ॲशची 60 आवक फ्रेट रेकची वाहतूक दरमहा अपेक्षित आहे. यातून वर्षाला सुमारे 200 कोटी रुपयांचा महसूल रेल्वेला मिळेल अशी माहिती मध्य रेल्वेनं दिली आहे.

**तूप भेसळ**

पुणे शहरात भेसळयुक्त तूप बनवून त्याची बाजारामध्ये विक्री करणाऱ्या टोळीवर चतु:शृंगी पोलिसांनी छापा टाकत कारवाई केली. पाषाणमधील एकनाथनगर भागात ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी येथून एकाला ताब्यात घेत सातशे किलो भेसळयुक्त बनावट तुपासह पाच लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

**हॉकी**

एसएनबीपी संस्थेच्या वतीनं आयोजित करण्यात येणाऱ्या अखिल भारतीय स्तरावरील 16 वर्षांखालील मुले मुली गटाच्या हॉकी स्पर्धा म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात सुरू आहेत. यामध्ये ध्यानचंद अकादमी संघानं निर्विवाद वर्चस्वासह उपांत्यपूर्व फेरी गाठली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश ढगाळ राहिलं. कमाल तापमान 32 अंश सेल्सियसच्या आसपास होतं. उद्या आकाश अंशतः ढगाळ राहील. तर कमाल तापमान आणखी वाढून ते 33 अंश सेल्सियस होण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**